असा. क्र. २०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, मे ५, २००७/वैशाख १५, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**पृष्ठे**

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.—** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . . . . . . २०२-२०३

दिनांक ५ मे २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक ५ मे २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

सन १९६६ चा महा. ३७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.



[**किंमत :** रुपये ९.००]

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " नियोजन प्राधिकरण अशा निदेशांच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत " या मजकुराऐवजी, " नियोजन प्राधिकरण अशा निदेशांच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६६ चा महा. ३७.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४८ मध्ये, दुसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, एक वर्षाच्या कालावधीमध्ये किंवा पहिल्या परंतुकान्वये वाढवलेल्या कालावधीमध्ये जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाले नसेल तर किंवा, यथास्थिति, जेथे जोते नसेल तेथे तळघराचे किंवा पादयष्टीचे (स्टील्ट) वरच्या स्तरापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाले नसेल तर अर्जदाराला विकासाच्या परवानगीसाठी नव्याने अर्ज करणे आवश्यक असेल. ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई